सकाळ, सप्तरंग, पुणे २४ फेब्रुवारी २०११ पृ.क्रं.४

क
या
उ
मा

# हुन्नरी हातांची हकिगत...

नीला शर्मा

शिवाजी माने हा सव्वीस वर्षांचा तरुण अनेक ठिकाणी विज्ञान खेळणी घेऊन जात असतो. कुठं तो ती करायला शिकवतो; तर कधी पवना किंवा भीमथडी जत्रेसारख्या ठिकाणी खेळणी विकून येतो. 'आयुका'च्या मुक्तांगण विज्ञानशोधिकेत कचऱ्यापासून विज्ञान खेळणी तयार करण्यात व शिकविण्याच्या कामात शिवाजी सध्या रमलेला आहे. काही काळापूर्वी तो या संस्थेत साफसफाईचे काम करायला यायचा. कंत्राटदाराने नेमलेल्या माणसांपैकी या शिवाजीची मनोवृत्ती काही वेगळीच होती.

इतर जण साफसफाई करून आल्या वाटेनं परत जात. शिवाजी मात्र या केंद्राचे प्रमुख असलेले अरविंद गुप्ता व त्यांचे सहकारी डॉ. विदुला म्हैसकर; तसेच अशोक रूपनेर यांचं काम बघत रेंगाळायचा. धीर एकवटून त्यानंही त्या सर्वांचं अनुकरण करत खेळणी तयार करून पाहायची परवानगी मागितली.

ती त्याला लगेच मिळाली. मग त्यानं दररोजचं सफाईचं काम संपल्यावर या जादूनगरीत थांबून खेळणी घडवायला सुरवात केली. त्याचा इतिहास पाहता हे सगळं परिवर्तन खूप विस्मयजनक म्हणायला हवं. शिवाजी हा लातूर जिल्ह्यातल्या चाकूर तालुक्यामधल्या जढाळा गावचा. त्याच्या वडिलांचा चप्पल तयार करण्याचा व्यवसाय होता. त्यांनी स्लीपर तयार करण्याचं यंत्र घेण्यासाठी सुमारे सत्तर हजार रुपये कर्जाऊ घेतले होते. व्यवसायात फटका बसल्यानं ते कर्जबाजारी झाले. त्यामुळे शिवाजीचं शिक्षण सातवीनंतर थांबलं. त्याला आणि त्याचा मोठा भाऊ प्रकाश, या दोघांना कुटुंबाला हातभार लावण्यासाठी राबावं लागलं.

एकजण या दोघांना कामासाठी केरळला घेऊन गेला. त्या बदल्यात त्यानं वडिलांना दहा हजार रुपये दिले. तिथं बुढ्ढी के बाल व सोनपापडी यांसारख्या मिठाया बनवण्याच्या कारखान्यात हे दोघे भाऊ कामगार म्हणून वर्षभर कष्ट उपसत राहिले. तिथं मालाची विक्री व लोकांशी संपर्क वाढवण्याची कला त्यांना शिकायला मिळाली. हे वर्षभर चाललं.



शिवाजी माने

या दोघांच्या आणखी दोन धाकट्या भावांचं आणि बहिणीचं शिक्षण कसंबसं दहावीपर्यंत झालं. त्यात या दोघांना खूप आनंद आहे. केरळहून आल्यानंतर शिवाजीनं पुण्यात एका 'सिक्युरिटी एजन्सी'कडे काम केलं. मध्येच एके ठिकाणी 'वेटर'चं; तर दोन ठिकाणी 'कुक'चं काम केलं. नंतर नवी सांगवीतल्या एका चौकात तो हातगाडीवर चप्पल विकू लागला. दरमहा बरं उत्पन्न मिळायची हमी नव्हती. म्हणून शिवाजी साफसफाईचं काम करू लागला. तो कंत्राटदार तीन हजार रुपये महिना पगार देत होता. गुप्तांनी शिवाजीची विज्ञानासाठीची ओढ हेरून त्याला विचारलं, "आम्ही तुला सहा हजार रुपये पगार देऊ शकू. पूर्ण वेळासाठी येतोस?"

शिवाजीसाठी तो क्षण 'टर्निंग पॉइंट' होता. तो म्हणतो, "मी तर प्रचंड सुखावलोच. माझ्यात अतोनात उत्साह निर्माण झाला. गणित किंवा विज्ञानाचं शिक्षण नसताना मी हे करू शकणार. मी इथं आल्यापासून विज्ञानातले कितीतरी नियम समजले. मी ते शालेय विद्यार्थ्यांना समजावून देऊ लागलो."

या केंद्रात शिवाजी संगणकावर वेगवेगळ्या प्रकारचं काम करतो. कोरल ड्रॉमध्ये जाऊन चित्रही काढतो, असं तो अत्यानंदानं सांगतो. खोडदच्या तरंग लांबी रेडिओ दुर्बीण केंद्रात जाऊनही तो विज्ञान खेळणी तयार करायच्या शाळा घेतो. त्याची पत्नी उमा महर्षी कर्वे बचत गटामार्फत या खेळण्यांची विक्री करते. पिंपळे गुरवमधल्या १५ बाय १५ फुटांच्या खोलीत ही खेळणी भरलेली असते. शिवाजीची तीन वर्षांची लेक अंकिता ते सारं पाहातच लहानाची मोठी होते आहे. कुणी सांगावं, विज्ञानप्रेमी आई-बाबांची ती वैज्ञानिक मुलगी म्हणून भविष्यात काही करून दाखवील!

संपर्क : ९९२२६८८०३९.